**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ च्या अंमलबजावणीबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १ जुलै, २००५.

**संदर्भ :-** शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-२०००/ प्र.क्र.(१७/२०००)/बारा,दिनांक २८ मार्च,२००५.

# परिपत्रक

राज्य लोकसंख्या धोरणाच्या अंतर्गत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ हे नियम दिनांक २८ मार्च,२००५ पासून अंमलात आले आहेत. त्यासंबंधीची संदर्भाधीन दिनांक २८ मार्च, २००५ ची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २८ एप्रिल,२००५ च्या राजपत्र भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेच्या प्रती सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख याना पाठविण्यात आल्या आहेत.

२. या अधिसूचनेद्वारे शासन सेवेतील गट "अ" ते "ड" मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी अधिसूचनेत विहित केलेली "लहान कुटुंबाची" अतिरिक्त अट लागू झालेली आहे. यास्तव यापुढे शासकीय सेवेत नोकरभरती करताना सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करुन जाहिरातीमध्ये आवश्यक ती अट नमूद केली जाईल आणि सदर नियमातील प्रतिज्ञापन नमुना "अ" (मराठी व इंग्रजी नमुने शीघ्र अवलोकनासाठी सोबत जोडले आहेत.) नुसार सर्व उमेदवाराकडून प्रतिज्ञापन घेतले जाईल याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश याद्वारे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बा. बा.नारायणकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

D:\Vagtar\D-12-U.SG.R.22-6-2005(paripatrak)
रोटा/एच-592(5000-6-2005)-1

महाराष्ट्र शासन

-५-
२५९

क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.१८/ २०१६/राजपत्रे-२

सार्वजनिक आरोग्य विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार

समूह इमारत,१० वा मजला,

नवीन मंत्रालय,मुंबई-४०० ००१

दिनांक - १५ फेब्रुवारी २०१६.

प्रति,

सह सचिव / उप सचिव,
(आस्थापना),
मंत्रालयीन सर्व विभाग,

**विषय- वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतचे प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे मंजूरीसाठी पाठविणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यसेवा (वैद्यकीय देखभाल) नियम-१९६१ व वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी आणि नियमात असत नसलेले वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्चाचे प्रस्ताव या विभागाकडे विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी पाठविण्यात येतात. त्यापैकी जास्तीत जास्त प्रस्ताव खाजगी रुग्णालयात हृदयरोगाबाबत घेतलेल्या वैद्यकीय उपचाराबाबत असतात. सदर प्रस्ताव या विभागाकडे पाठविताना एन्जिओप्लॅस्टी करिता वैद्यकीय खर्चाची खालीलप्रमाणे परिगणना करुन पाठवावे.

| | |
|---|---|
| (१) प्रत्येक स्टेंटची (Stent) प्रत्यक्ष किंमत / जास्तीत जास्त | - रुपये - ६०,०००/- |
| (२) Cardiologist फी जास्तीत जास्त | - रुपये - १०,०००/- |
| (३) डॉक्टरांची प्रती व्हीजिट फी | - रुपये - ५००/- |
| (४) रुग्णालय वास्तव्य खर्च प्रति दिन | - रुपये - १,०००/- |
| (५) आयसीयु (ICU) वास्तव्य खर्च प्रति दिन | - रुपये - २,०००/- |
| (६) शस्त्रक्रियागार (Operation Theatre Chagres) | - रुपये - १०,०००/- |

तसेच खाजगी रुग्णालयात बायपास सर्जरीबाबत घेतलेल्या वैद्यकीय उपचाराबाबतचे प्रस्ताव या विभागाकडे पाठविताना वैद्यकीय खर्चाची परिगणना खालीलप्रमाणे करुन पाठवावे.

| | |
|---|---|
| (१) हृदयशस्त्रक्रिया तज्ञ फी (Cardiac Surgeon fee) | - रुपये - ३०,०००/- |
| (२) भूलतज्ञ फी (Anasthest Charge) | - रुपये - १०,०००/- |
| (३) डॉक्टरांची प्रती व्हिजिट फी | - रुपये - ५००/- |
| (४) रुग्णालय वास्तव्य खर्च प्रति दिन | - रुपये - १,०००/- |
| (५) आयसीयु (ICU) वास्तव्य खर्च प्रति दिन | - रुपये - २,०००/- |
| (६) शस्त्रक्रियागार (Operation Theatre Chagres) | - रुपये - १०,०००/- |

(सं.ह.करंजेकर)
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,